वि. स. सुखटणकर

म. ग्रं. सं. ठाणे
ग्रंथ ब्रा. बा
क्र. १५५५८

IRBK-0116557



# शिवशाहींतल्या चातुर्यकथा

(स चि त्र)

IRBK-0116557

लेखक

विनायक सदाशिव सुखठणकर

**रम्यकथा प्रकाशन,**
३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणें ३०

किंमत १। रुपया

प्रकाशक :
वा. ग. मेहेंदळे
रम्यकथा प्रकाशन
१९२ नारायण पेठ,
पत्र्या मारुतीजवळ, पुणें ३०.

[पुनर्मुद्रणादिक सर्वाधिकार
प्रकाशकाच्या स्वाधीन]

प्रथमावृत्ति : सप्टेंबर १९७०
द्वितीयावृत्ति : डिसेंबर १९७१
तृतीयावृत्ति : डिसेंबर १९७५

मुद्रक :
वा. ग. मेहेंदळे
जयभारत मुद्रणालय
४५१ बुधवार, पुणें २

# प्रस्तावना

श्रीज्ञानेश्वरांपासून पेशवाईच्या अखेरीपर्यंतच्या काल-खंडांतील महाराष्ट्राच्या इतिहासांतील, रंजन व बोध हे दोन्ही हेतु साधणाऱ्या (१) शिवशाहींतील चातुर्यकथा, (२) मराठे-शाहींतील चातुर्यकथा व (३) पेशवाईंतील चातुर्यकथा या तीन पुस्तकांतील या ७५ गोष्टी म्हणजे पांच शतकांतील आपल्या परंपरागत सांस्कृतिक धनाचा एक लहानसा कोशच असें म्हणतां येईल.

शिवाजीमहाराजांनीं तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याची मुहुर्तमेढ रोंवली, तो स्वराज्याचा सूर्योदय मानला तर त्या-आधींचीं तीन–चार शतकें म्हणजे त्या स्वराज्याचा उष:काल असें गृहीत धरून त्या कालावधींत होऊन गेलेल्या थोर विभू-तींच्या आयुष्यांतील कांहीं संस्मरणीय प्रसंगांचाहि या 'शिव-शाहींतल्या चातुर्यकथा' मध्यें अंतर्भाव केला आहे.

शाहूमहाराज साताऱ्च्या गादीवर आल्यापासून त्यांच्या अंतापर्यंतच्या गोष्टींना 'मराठेशाहींतील चातुर्यकथा' असें संबोधलें आहे.

शाहूमहाराजांनंतरच्या काळांत सातारच्या गादीवर आलेल्या राजांची सत्ता त्यांच्यामधील कर्तृत्वाच्या अभावीं नामशेष झाली व पेशवे मराठी साम्राज्याचे सर्वाधिकारी झाले. त्या अर्धशतकांतील प्रसंगांना 'पेशवाईतील चातुर्यकथा' असें नांव दिलें आहे.

'भोजराजा व कालिदास,' 'बिरबल व बादशहा' अशा स्वरूपाच्या पुस्तकांतील गोष्टी वाचण्याची संवय झालेले वाचक या तिन्ही पुस्तकांतील कांहीं गोष्टींना 'चातुर्यकथा' म्हणतां येईल कीं काय अशी शंका घेतील.

'चातुर्ये शृंगारे अंतर'...'बहुतांचे मुखीं उरावें'... 'बहुतांचे अंतरीं भरावें'...'उत्तम गुणीं विवरावें' या ज्या 'नाना चातुर्याच्या खुणा' दासबोधांतील 'चातुर्यलक्षण-निरूपण' या प्रकरणामध्यें रामदासस्वामींनीं सांगितल्या आहेत, त्या त्यांनीं विचारांत घेतल्या तर बुद्धीला दिपवणाऱ्या गोष्टींइतकेंच कृति किंवा वाणी यांच्याद्वारें मानवी अंतःकरणांतील उदात्त भावना जागृत करणाऱ्या गोष्टींनाहि चातुर्य हें विशेषण लावणें औचित्ययुक्त ठरेल हें माझें या बाबतींतील स्पष्टीकरण अशा या वाचकांना पटेल व त्यांचें शंकानिरसन होईल अशी मला आशा आहे.

—वि. स. सु.

म. ग्रं. सं. ठाणे
क्र. क ९६५५० ३१८१०६
दि.

गोष्ट १ ली

# कच्चें मडकें

" मार्गी चालती स्वानंद भरित।
सप्रेम हरीचे गुण वर्णीत,
नानापरी चातुर्य कवित्व,
नवरस उत्पन्न करिताती ! ॥"

असें महिपतीनें निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई हीं चार भावंडें एकदां तीर्थयात्रेला निघालीं त्यावेळच्या त्यांच्या दिनक्रमाचें वर्णन केलें आहे. त्यांचा संतमित्र नामदेव हाहि त्यांच्याबरोबर ही यात्रा करीत होता.

यात्रा करतां करतां हीं सारींजण तेरगांवीं जाऊन पोहोंचलीं. त्या गांवच्या देवळामध्यें नामदेवाचें कीर्तन झालें. गोरोबा कुंभार हा संत या गांवामध्यें रहात असे. कीर्तन संपल्यावर गोरोबानें मोठ्या भक्तिभावानें त्या सर्वांना आपल्या घरीं नेलें व त्यांचें आदरतिथ्य केलें. गोरोबाच्या घरीं मडकीं घडवण्याचीं अनेक हत्यारें होतीं. त्यांत एक थापटणें होतें. तें पाहिल्यावर मुक्ताबाई गोरोबाला म्हणाली, 'काका, हें काय ?'

'हें थापटणें आहे. या थापटण्यामुळें मीं घडवलेलीं मडकीं कच्चीं आहेत कीं पक्कीं आहेत हें कळतें.' गोरोबानें उत्तर दिलें. यावर मुक्ताबाई पुन्हां हंसून म्हणाली, 'काका, आपण सर्व माणसें म्हणजे ईश्वरनिर्मित मडकींच नव्हत का ?

आतां आम्हीं तुमच्यासमोर बसलों आहोंत, त्यांपैकीं कच्चीं मडकीं कोणतीं व पक्कीं कोणतीं हें आम्हांला सांगा पाहूं!'

गोरोबाला मुक्ताबाईच्या या चतुर भाषणाचें मोठें कौतुक वाटलें. त्यानें लगेच समोरचें थापटणें उचललें व त्या चारहि भावंडांच्या समोर जाऊन आळीपाळीनें एकेकाच्या डोक्यावर तें जोरानें हाणलें. नवलाची गोष्ट ही कीं, त्यांपैकीं कोणीहि याप्रसंगीं हूं कीं चूं केलें नाहीं. शांतपणें थापटण्याच्या तडाख्याचें दु:ख त्या सर्वांनीं सहन केलें.

नंतर गोरोबा नामदेवाकडे वळला. आपल्याहि डोक्यावर गोरोबा थापटण्याचा तडाखा द्यायला येत आहे हें पाहिल्यावर नामदेव रागानें भडकला–'खबरदार गोऱ्या!' तो गोरोबावर ओरडला–'माझ्या डोक्यावर थापटणें मारलेंस तर इतरांसारखें मी तें सहन करणार नाहीं! हा काय तुझा वाह्यातपणा? पाहुणे म्हणून घरीं बोलावतोस व आमच्या डोक्यावर थापटणें हाणतोस, ही रीत झाली काय?'

गोरोबानें आतां नामदेवाच्या डोक्यावर हाणण्याकरतां वर केलेलें थापटणें खालीं घेतलें व त्याचा थोडासा नुसता स्पर्श नामदेवाच्या डोक्याला केला. मग नामदेवाकडे बोट दाखवून मोठ्यानें हंसून तो म्हणाला, 'तुम्हां पांचहिजणांमध्यें हें एकच मडकें तेवढें कच्चें निघालें!'

गोरोबाचे हे शब्द ऐकून मुक्ताबाई म्हणाली, 'काका, तुम्हीं केलेली ही परीक्षा अगदीं खरी आहे!' व मग ती व तिचे तिघेहि बंधु खदखदां हंसूं लागले.

थोड्या वेळानें नामदेवाचा राग ओसरल्यावर तो विचार करूं लागला. जी गोष्ट आपल्याहून श्रेष्ठ अशा ज्ञानदेवासारख्या

संतानेंसुद्धां शांतपणें सहन केली, ती आपल्याला सहन करता आली नाहीं यावरून संताचीं मुख्य लक्षणें जीं देहभाव नष्ट होणें व अहंकार नसणें या गोष्टी आपल्यामध्यें अजन आलेल्या नाहींत याची त्याला आतां जाणीव झाली. यापुढें पश्चात्ताप-युक्त मनानें आपल्यामधील ही कमतरता नाहींशी करण्याचा त्यानें सतत प्रयत्न चालविला व अशा रीतीनें कांहीं काळ गेल्यावर त्याला खरेंखुरें संतपद प्राप्त झालें.

----

गोष्ट २ री

# पैठणांतील कुटाळवटा

संत एकनाथ हे पैठण गांवामध्यें रहात असत. या गांवां-तले कुटाळ लोक ज्या एका ओट्यावर बसून गांवांतल्या लोकांच्या कुटाळक्या करीत, त्यास कुटाळवटा असें तेथल्या लोकांनीं नांव ठेवलें होतें. एकनाथांची भगवद्भक्ति व कथा-कीर्तन करण्याचा त्यांचा पेशा, या दोन गोष्टींची चेष्टा करणें हा या कुटाळकंपूचा नित्यक्रम झाला होता. पण एकनाथांची आपण कितीहि कुटाळकी केली तरी त्यांना एकहि दिवस राग येत नाहीं, ती सर्व कुटाळकी ते शांतपणें सहन करतात याचें त्यांना मोठें आश्चर्य वाटे.

एकदां असें झालें कीं, एक पांथस्थ गरीब ब्राह्मण या गांवांत आला. पैठण हें गांव सुखवस्तु व विद्वान लोकांचें गांव म्हणून प्रसिद्ध होतें. तेव्हां अशा या ठिकाणीं जाऊन तेथल्या लोकांकडे द्रव्ययाचना करावी, हा हेतु मनांत धरून तो पैठण-मध्यें आला होता. त्याला पहातांच हा एक चेष्टेला चांगला

विषय सांपडला असें कुटाळवटचावर बसलेल्या त्या टारगटांना वाटलें व त्यांनीं त्याला त्याच्या आगमनाचें कारण विचारलें. बिचाऱ्या ब्राह्मणानें भाबडेपणानें आपण दारिद्रयानें कसे गांजलों आहों हें त्यांना सांगितलें व शेवटीं काकुळतीला येऊन तो त्यांना म्हणाला, ' दयाळू सज्जनांनो ! माझी सध्यांची एक द्रव्याची अडचण आपण दूर केली तर आपले माझ्यावर महदुपकार होतील. माझ्या मुलाच्या मुंजीसाठीं मला २०० रुपये हवे आहेत. कसेंहि करून एवढी माझी गरज भागवण्याची कृपा करा. '

त्या ब्राह्मणाचें हें बोलणें ऐकल्यावर ते कुटाळ खो खो हंसत त्याला म्हणाले, ' अवघे २०० रुपयेच ना ? त्याचें एवढें काय ! एवढी रक्कम आम्ही तुला सहज देऊन टाकूं. पण आमची एक अट आहे. या गांवांत एकनाथ नांवाचे एक कीर्तनकार राहातात. त्यांना राग कधीं येत नाहीं, अशी त्यांची ख्याति आहे. त्यांच्या बाबतींत तूं एक गोष्ट केली पाहिजेस. त्यांना राग आणून दाखवशील तर लगेच २०० रुपयांची रक्कम आम्ही तुझ्या हातावर ठेवूं ! '

ब्राह्मण या अटीप्रमाणें वागण्यास कबूल झाला व तडक एकनाथमहाराजांच्या घरीं गेला. एकनाथ त्यावेळीं देवपूजा करीत होते. ब्राह्मण सरळ देवघरांत गेला व झटदिशीं देवपूजा करण्यांत मग्न असलेल्या एकनाथांच्या मांडीवर बसला. पण काय आश्चर्य ! आपल्या या आचरटपणामुळें एकनाथ रागानें भडकतील ही त्या ब्राह्मणाची अटकळ खोटी ठरली. आपल्या मांडीवर बसलेल्या त्या अनोळखी ब्राह्मणाला स्नेहालिंगन देऊन एकनाथ म्हणाले, ' वा: ! वा: ! याला म्हणतात खरें प्रेम !

माझ्या भेटीला पुष्कळ लोक येतात, पण आजपर्यंत त्यापैकीं कोणींहि माझ्याबद्दलचें आपलें प्रेम इतक्या उत्कटतेनें व्यक्त केलें नव्हतें !'

एकनाथांनीं शांतपणें, सहास्य मुद्रेनें उच्चारलेले हे शब्द ऐकून ब्राह्मण अगदीं थिजून गेला. पण याहूनहि जास्त वाह्यातपणाचा असा आणखीं एखादा प्रकार आपण केला म्हणजे एकनाथ नक्की आपल्यावर रागावतील, असें त्यास वाटलें.

देवपूजा आटोपल्यावर एकनाथांनीं ब्राह्मणाला आग्रहपूर्वक दुपारच्या भोजनाला ठेवून घेतलें. भोजनाच्या वेळीं ब्राह्मणाचें पान एकनाथांच्या पानाशेजारींच मांडलें होतें. भोजन चालू झाल्यावर एकनाथांची बायको गिरिजाबाई ओणवी होऊन ब्राह्मणाला तूप वाढूं लागली. ही संधि चांगली आहे, असें ब्राह्मणानें ठरविलें व टुणदिशीं उडी मारून ओणव्या होऊन तूप वाढीत असलेल्या गिरिजाबाईच्या पाठीवर तो बसला. तत्क्षणीं एकनाथ आपल्या बायकोला म्हणाले, ' सांभाळ ग ! पाहुणे तुझ्या पाठीवरून खालीं पडतील !' गिरिजाबाई झाली तरी एकनाथांचीच धर्मपत्नी ! ती स्मितपूर्वक म्हणाली, ' त्याची तुम्हांला काळजी नको ! माझें मूल हरिबाळ याला पाठीवर घेऊन घरांतलें कामधाम करण्याची मला संवय आहे. तें एक माझें बाळ जसें माझ्या नेहमीं पाठीवर असतें, तसेंच आज हें एक दुसरें बाळ मीं पाठीवर घेतलें आहे !'

त्या माऊलीचे हे शब्द ऐकल्यावर ब्राह्मणाची काय स्थिति झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी ! ढळढळां आंसवें गाळीत त्यानें आतां एकनाथांच्या पायांवर लोटांगण घेतलें व गांवांतल्या कुटाळकंपूच्या सांगण्यावरून केवळ दोनशें

रुपये त्यांच्याकडून मिळविण्याकरितां आपण अशा रीतीचें वाईट वर्तन करण्याला कसे प्रवृत्त झालों ही सर्व हकीकत त्यानें त्यांना सांगितली. ती ऐकल्यावर एकनाथमहाराज त्याला म्हणाले, 'अरेरे! सद्‌गृहस्था, हें आधींच मला तूं कां सांगितलें नाहींस ? मला राग कधीं येत नाहीं ही गोष्ट खरी, पण तुला दोनशें रुपये मिळावे म्हणून आज तुझ्यासाठीं मी एक वेळ तरी रागावलों असतों!'

---

गोष्ट ३ री

## सोंगट्यांचा खेळ

एक दिवस सकाळीं जिजाईला करमेना म्हणून तिनें शिवबास बोलावणें पाठवलें. शिवबा आल्यावर दोघेंहि मायलेंकरें गंमतीनें सोंगट्या खेळण्यास बसलीं. खेळांत जिजाईची सरशी झाली व डाव शिवबावर लागला. नंतर दोघांमध्येंहि खेळीमेळीचें संभाषण सुरू झालें. आईनें डाव जिंकला तेव्हां तिनें आपल्याकडून कांहीं मागून घ्यावें असें शिवबा बोलला. जिजाईनें दूर एका उंच डोंगरपठारावर असलेल्या किल्ल्याकडे बोट दाखवलें व मग ती म्हणाली—

" पुण्याच्या तोंडाला ।
जेजुरीच्या बारीला ।
आहे सिंहगड किल्ला ।
तो घेऊन द्यावा मला ।
आउक्ष मागेन तुझ्या राज्याला ।"

मागितलीच तर जिजाबाई एखादी लहानसहान वस्तु मागेल, असें शिवाजीला वाटलें होतें. नुसत्या सोंगट्यांच्या खेळामध्यें आपल्याला हार दिल्याबद्दल मुसलमानांच्या अनेक वर्षें ताब्यांत असलेला व अजिक्य समजला गेलेला सिंहगड किल्ला ती मागेल याची त्याला कल्पना नव्हती. पण खेळांत का होईना, मातोश्रीला आपण शब्द दिला आहे. तो पाळला पाहिजे, तिचा हिरमोड होऊं देतां कामा नये असें त्यानें ठरवलें व लगेच तानाजी मालुसऱ्याला बोलावण्याकरतां त्यानें जासूद रवाना केला. तानाजी येतांच त्याला शिवाजीनें सिंहगड जिंकण्याची ही कामगिरी सांगितली. तानाजी मालुसरे जेवढा शूर तेवढाच स्वामीनिष्ठ ! शिवाजीच्या तोंडून शब्द निघ-



ण्याचाच अवकाश; आपल्या हाताखालीं दोनशें मावळे शिपाई व बरोबर आपली यशवंती घोरपड घेऊन तो सिंहगड किल्ला घ्यावयाला निघाला. मध्यरात्रीच्या सुमारास त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचल्यावर किल्ल्याच्या तटावर त्यानें आपली घोरपड चढवली व तिला धरून तो व त्याचे सर्व मावळे तट चढून आंत किल्ल्यावर उतरले. इतक्यांत त्यांची चाहूल लागल्यामुळें किल्ल्यावरचे सर्व मुसलमान शिपाई त्यांच्यावर चालून आले. पण तानाजी व त्याचे शूर मावळे जिवावर उदार होऊन इतक्या निकरानें लढले कीं, शत्रूच्या शिपायांना माघार घ्यावी लागली व थोड्या वेळानें किल्ल्यावर शिवाजीचा भगवा झेंडा डौलानें फडकूं लागला ! पण दुर्दैवानें सिंहगड जिंकणारा तो मोहरा या प्रसंगीं शत्रूबरोबर झालेल्या या हातघाईच्या चकमकींत कामाला आला. तानाजी पडला. धन्याची कामगिरी निष्ठेनें पार पाडण्याकरतां त्यानें आपल्या प्राणांचें मोल दिलें होतें !

सिंहगड किल्ला सर झाला, पण तानाजी पडला हें वृत्त जेव्हां शिवाजीनें ऐकलें, तेव्हां शोकाच्या भरांत त्यांच्या तोंडून दुःखोद्‌गार निघाले–' गड आला, पण सिंह गेला ! '

जे शब्द ऐकले म्हणजे आजसुद्धां आपणां सर्वांच्या अंगावर रोमांच उभे राहतात, त्या ' गड आला, पण सिंह गेला ! ' या शब्दांचें मूळ अशारीतीनें, ज्यांचीं नावें महाराष्ट्राला ललामभूत झालीं आहेत, त्या जिजाई व शिवाजी या दोघां मायलेकरांच्या सोंगट्यांच्या खेळामधील गंमतीच्या संभाषणामध्यें आहे !

---

गोष्ट ४ थी

# रायगडावरील हिरकणी

रायगड किल्ल्यावर टकमक नांवाचें एक टोंक आहे. या टोंकावरून खालीं नजर फेंकली, तर एक निमुळता कडा व त्याच्या भोंवतालीं गर्द रान असें भयानक दृश्य पहावयाला मिळतें. या गडाच्या पायथ्याशीं असलेल्या कोळंब नांवाच्या खेड्यांत गवळी लोकांची वस्ती आहे. शिवाजीमहाराजांचें जेव्हां या रायगडावर वास्तव्य होतें, तेव्हां एक गवळण रोज या कोळंब गांवांतून गडावर दूध घालावयाला येई. एक दिवस ती रोजच्याप्रमाणें दूध घेऊन गडावर आली, पण तो कोजागरीचा दिवस असल्यामुळें कोजागरीचा उत्सव पहाण्यांत दंग होऊन बेसावधपणें सूर्यास्ताला गडाचे दरवाजे बंद होईपर्यंत गडावरच ती राहिली. नंतर खालीं आपल्या गांवीं जावयाला निघाल्यावर गडावरचे दरवाजे बंद झाले आहेत हें तिला कळून आलें. घरीं तिचें तान्हें मूल होतें. रात्रभर तें भुकेलें राहील या विचारानें ती आतां हवालदिल झाली. शेवटीं मातृप्रेमाच्या भरांत तिनें एक साहस करण्याचें ठरवलें. टकमक टोंकावर जाऊन त्यांतल्यात्यांत कमी धोक्याचें असें तेथलें एक ठिकाण तिनें शोधून काढलें व तेथून खालीं उतरावयाला सुरुवात केली. सुदैवानें तिला या साहसामध्यें यश आलें व ती सुखरूप त्या रात्रीं आपल्या घरीं जाऊन पोहोंचली.

दुसरे दिवशीं नेहमींप्रमाणें डोक्यावर दुधाचा हंडा घेऊन ती गड चढून येत असतांना गडावरच्या लोकांना ती दिसली व ते सर्वजण आश्चर्यचकित झाले. कारण आदल्या दिवशीं संध्या-

काळीं गडाचे दरवाजे बंद झाल्यामुळें ती गडावर अडकून पडली होती हें त्यांना माहीत होतें. तिनें आपण टकमक टोंकावरून उतरून खालीं कसे गेलों, हें त्यांना सांगितलें. पण तिनें सांगितलेल्या या गोष्टीवर कोणाचाहि विश्वास बसेना. कारण कुठूनहि रायगडावरून खालीं उतरणें ही अगदीं अशक्य गोष्ट अशी किल्ल्यावरील सर्व लोकांची समजूत होती.

शेवटीं हा प्रकार महाराजांच्या कानांवर गेला व जातीनिशीं या गोष्टीची शहानिशा करण्याकरतां त्या गवळणीला घेऊन ते टकमक टोंकावर गेले व तेथून ती कशी खालीं उतरली, हें तिच्या तोंडून त्यांनीं ऐकलें, तेव्हां तिच्याकडून हें साहसकृत्य खरोखरींच घडलें होतें, याबद्दल त्यांची खात्री झाली.

त्या गवळणीच्या या साहसाचें शिवाजीमहाराजांना एवढें कौतुक वाटलें कीं, त्यांनीं तिला एक मोठें इनाम दिलें, एवढेंच नव्हे तर आपल्या या साहसी कृतीनें गडावरील लोकांमध्यें हिरकणीप्रमाणें ती चमकली होती, या अर्थानें तिच्या स्मरणार्थ या टकमक टोंकाला त्यांनीं 'हिरकणी' हें नवें नांव दिलें.

त्या गवळणीच्या या धाडसी कृत्यापासून एक व्यावहारिक धडा घ्यावयालाहि महाराज चुकले नाहींत. गवळण ज्या ठिकाणीं कडा उतरून गेली होती, तेथें पाषाणाची तटबंदी करून तें ठिकाण त्यांनीं जास्ती मजबूत व निमुळतें केलें !

---

गोष्ट ५ वी

# बहिणाबाईचें वासरूं

तुकारामाची शिष्या म्हणून प्रसिद्ध असलेली संत बहिणाबाई हिचा, वेरूळजवळ देवगांव म्हणून एक खेडें आहे तेथें जन्म झाला. तिच्या लहान वयांत तिच्या बापावर कांहीं आपत्ति आली व तो देशोधडीला लागला. बहिणाबाई, तिची आई व बहिणाबाईचा भ्रतार यांना घेऊन तो यात्रेला निघाला. बहिणाबाई त्यावेळीं अवघ्या अकरा वर्षांची होती.

"कोरान्नाची मागोनिया भिक्षा ।
क्रमीतसे वाट,
सोसूनीया कष्ट नानापरी !"

असें या यात्रेचें बहिणाबाईनें आपल्या आत्मनिवेदनपर काव्यांत वर्णन केलें आहे.

प्रवास करतां करतां हीं सारींजण शेवटीं कोल्हापुरास येऊन पोहोंचलीं. या शहरांत त्यावेळीं जयरामस्वामी या भगवद्भक्ताचीं भागवतावर पुराण प्रवचनें चाललीं होतीं. तीं ऐकण्यांत या सर्वांचें मन इतकें रमूं लागलें कीं, पुढें मार्गक्रमण न करता या शहरांतच कांहीं काळ हें कुटुंब स्थिर झालें. बहिरंभट नांवाच्या एका परोपकारी वृत्तीच्या ब्राह्मणाच्या घरीं हें कुटुंब राहूं लागलें. त्यांच्या गरीब परिस्थितीबद्दल दया आल्यामुळें एकदां आपल्या गोप्रदानांत मिळालेली एक सवत्स कपिला गाय या बहिरंभटानें त्यांना दिली. थोड्याच दिवसांत बहिणाबाईला या गाईच्या वासराचा फार लळा लागला व त्याचें ती

प्रेमानें पालनपोषण करूं लागली. त्या वासरालाहि दिवसभर तिच्याशिवाय करमत नसे.

बहिणाबाईनें आपल्या काव्यांत लिहून ठेवलें आहे, म्हणनच खरें मानणें भाग आहे, इतकें या वासराचें बहिणावाईवर प्रेम जडलें होतें. या वासराचें वर्णन करतांना बहिणाबाई लिहिते—

"मीच सोडी तरी वत्स रिघे दोहा।
मीच पाणी पाजी, तृण घाली मीच।
मजवीण कांच मनीं वाहे !
मी जाय पाणीया ओरडें तें वत्स।
मोकळेंच वत्स असोनिया।
नवचे आपण गाईपासी।
गाय गोठा घरीं, जातां मी स्नानासी।
सवें चाले !
रात्रीच्या अवसरीं वत्स निजे सेजें।
ऐसें नानापरी वत्स न तें सोडी।
मजही आवडी तयापाशीं।"

घरींदारीं, इतकेंच नव्हे तर बहिणाबाई देवळांत कथा श्रवणाकरतां जाऊं लागली तर तेथेंहि हें वासरूं तिची कशी पाठ सोडीत नसे व त्यामुळें एकदां सबंध गांवाला चकित करणारा एक प्रसंग कसा घडून आला याचें हृदयंगम वर्णन बहिणाबाईनें केलें आहे. तें असें—

"मायबापेंसंगें मीही जाय कथे।
वत्सही तेथें सवें चाले ! ।"

एक दिवस देवळांत नेहमींपेक्षां श्रोत्यांची जास्त गर्दी झाली होती, म्हणून बहिणाबाईच्याजवळ उभ्या असलेल्या या वासराला एका गृहस्थानें देवळाबाहेर नेऊन एका झाडाला बांधून ठेवलें. पण या वासरानें यावेळीं मोठमोठ्यानें हंबरून एवढा आकांत केला कीं, देवळांत कथा सांगत असलेल्या जयरामस्वामींच्या कानांवर या वासराचें तें काकळूतवाणें हंबरणें गेलें. मग काय झालें ? बहिणाबाई लिहिते—

" साक्ष अंतरींचा तो स्वामी जयराम ।
वत्स अंतर्याम ओळखिलें ! ।
म्हणे, " आणा त्या वत्सासी अंतरीं ।
काय नाहीं हरी आत्मवेत्ता ?
कथेलागीं होतो जीव कासावीस ।
पशु कीं तयास म्हणूं नये !'
आणवीलें वत्स बैसवी आसनीं ।
पाहोनि नयनीं तोष वाटे ! ।
मजही कृपावंत कृपेचिया शब्दें ।
बोलावी प्रारब्धें पूर्वपुण्यें ।
कुरवाळुनी दोघां पाहे पूर्ण दृष्टि ।
न मानेची गोष्टी जनांचिया ।
मग म्यां आपुलें आपण पाहिलें ।
चरणीं घातलें लोटांगण ! ।
वत्सही तैसेंच पायांवरी पडे ! ।
अपूर्वता घडे सर्वजना !"

बहिणाबाई, तिचें वासरूं व वासराचें अंतर्याम ओळखणारा संत जयरामस्वामी, यासंबंधींचें बहिणाबाईच्या काव्यांत आलेलें हें हृदयंगम वर्णन एकदां वाचल्यावर कुठल्या वाचकाच्या तें स्मरणांतून जाईल ?

----

गोष्ट ६ वी

# सांकेतिक भाषेंतील एक पत्र

शिवाजी महाराजांनीं सुरू केलेल्या स्वराज्यसंस्थापनेच्या उद्योगामध्यें त्यांना सहाय्य करण्याकरतां रामदासस्वामी नेहमीं तत्पर असत. हें त्यांचें सहाय्य नुसतें शाब्दिक उपदेशपर नसून सक्रिय असे. रामदासांनीं देशभर ठिकठिकाणीं व तीर्थक्षेत्रीं सातशें मठ स्थापन केले होते. या मठाधिपतींकडून त्या त्या ठिकाणीं घडणाऱ्या गोष्टींसंबंधींच्या बातम्या त्यांना लगेच कळत. त्यांतल्या शिवाजी महाराजांच्या राजकारणाशीं संबंध असलेल्या बातम्या ते तांतडीनें पत्र लिहून महाराजांच्या कानांवर घालीत. अशीं पाठविलेलीं हीं पत्रें एखादे वेळीं मुसलमानांच्या हातीं पडलीं तर त्यांना त्यांतील मजकुराचा उलगडा होऊं नये म्हणून तीं सांकेतिक भाषेंत लिहिण्याची ते खबरदारी घेत. शिवाजीवर स्वारी करण्याकरितां विजापूरचा सुलतान अफझुलखानाला सैन्य देऊन पाठवीत आहे, हें कळल्यावर शिवाजीमहाराजांना त्याबाबतींत सावध करण्याकरतां स्वामींनीं तांतडीनें सांकेतिक स्वरूपांत त्यांना लिहिलेल्या पुढील पत्रावरून त्यांच्या या सांकेतिक पत्रलेखनाची कल्पना येते–



"विवेकें करावें कार्यसाधन। जाणार नरतनु हें जाणोन।
पुढील भविष्यार्थी मन। रहायेची नये॥ १ ॥
चालो नये असन्मार्गें। सत्यता बाणल्या अंगीं॥
रघुवीर कृपा ते प्रसंगीं। दासमहात्म्य वाढवी॥२॥
रजनीनाथ आणि दिवाकर। नित्यनेमें करिती संचार।
घालिताती येरझार। लाविलें भ्रमण जगदीशें॥३॥
आदिमाया मूळ भवानी। हेची जगताची स्वामिनी।
एकांतीं विवेकें धरूनी। इष्ट योजना करावी॥४॥

वरील सोळा चरणांपैकीं पहिल्या चौदा चरणांमधील दर एक चरणाचें आद्याक्षर घेऊन, तीं सर्व अक्षरें एकापुढें एक जोडलीं तर—

'विजापूरचा सरदार निघाला आहे' हें वाक्य तयार होतें !

----

गोष्ट ७ वी

# रामदासस्वामी व दुःखी म्हैस

एकदां रामदासस्वामी आपले शिष्य जयरामस्वामी, रंगनाथस्वामी व आनंदमूर्ति यांना घेऊन प्रवासाला निघाले. वाटेंत त्यांना एक गांव लागलें. सुंदर नदी वाहाते आहे अशा ठिकाणीं डोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें तें गांव पाहिल्यावर त्यांचें मन तेथें रमलें व थोडे दिवस त्या गांवांतच वास्तव्य करण्याचें त्यांनीं ठरवलें. एक गरीब विधवा स्त्री त्या गांवांत रहात असे. तिच्या घरीं ते तिघेजण बिऱ्हाडाला राहिले.

रोज पहांटेला नदीवर जाऊन तेथें स्नान करायचें, मग दुपारपर्यंत झाडाच्या सांवलीखालीं बसून जपजाप्य, ध्यानधारणा यांत वेळ घालवायचा व घरीं येऊन भोजन करावयाचें, असा त्यांचा येथें दिनक्रम असे.

एक दिवस ती स्त्री रामदासस्वामी व त्यांचे शिष्य यांना म्हणाली, 'महाराज, घरीं वैरण नाहीं. म्हशीस रानांत सोडावी तर उन्हाळ्याचे दिवस, तेथें चारा नाहीं. तरी यापुढें तुम्ही सकाळीं नदीवर जातां तेव्हां ही म्हैस व तिचें रेडकूं यांना नदीतीरावर एका ठिकाणीं थोडासा चारा आहे, तेथें नेऊन

चरायला सोडा व संध्याकाळीं जाऊन त्यांना परत घरीं घेऊन या.'

दुसऱ्या दिवशीं नदीवर जातेवेळीं त्या स्त्रीनें सांगितल्याप्रमाणें रामदासस्वामींच्या शिष्यांनीं म्हैस व तिचें रेडकूं यांना नदीवर नेलें व तेथें त्यांना चरायला सोडलें. मग अस्तमान झाल्यावर आनंदमूर्ति त्यांना परत घरीं आणावयाला नदीतीरावर गेला. पहातो तर तेथें म्हैस चरत आहे, पण तिचें रेडकूं कुठें दिसेना. रेडकूं श्वापदांनीं खाल्लें होतें, हें त्याला आतां कळून आलें. कष्टी मनानें म्हैस घेऊन तो घरीं आला व तिला नेऊन दाव्याला बांधल्यावर रेडकाची हकीकत त्यानें सर्वांना सांगितली ती स्त्री आतां ढळढळां रडूं लागली व म्हणाली, 'आतां म्हैस धार कशी देईल ?'

थोड्या वेळानें धार काढण्याची रोजची वेळ होतांच, नित्याप्रमाणें आपलें रेडकूं जवळ आलें नाहीं, हें पाहून म्हैस हंबरूं लागली. मग कदाचित् ती धार देते का पहावें म्हणून ती स्त्री तपेली घेऊन तिच्याजवळ गेली व स्तन पिळूं लागली, पण आपलें रेडकूं दूध प्यायला आलें नाही हें पाहिल्यावर ती म्हैस अधिकच मोठ्यानें हंबरडे फोडूं लागली, व तिची कास तटतटली तरीहि ती त्या स्त्रीला धार काढूं देईना ! बिचारी ती स्त्री आतां आपल्या दैवाला बोल लावीत स्वयंपाकघरांत जाऊन रडत बसली.

हें सर्व पाहिल्यावर जयरामस्वामी, रंगनाथस्वामी व आनंदमूर्ति हे स्वामींचे तिघेंहि शिष्य फार कष्टी झाले. त्या स्त्रीनें आपल्यावर सोंपविलेली कामगिरी नीट रीतीनें आपणांकडून पार पडली नाहीं म्हणून हा प्रसंग तिच्यावर ओढवला

या विचारानें त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. काय करावें हें त्यांना सुचेना. इतक्यांत रामदासस्वामी आपल्या आसनावरून



उठले. त्या म्हशीजवळ जाऊन तिच्या पाठीवरून त्यांनीं मायेनें हात फिरवला. मग जणूं आपल्या पोटच्याच मुलीचें सांत्वन करावें, अशा वृत्तीनें दयापूर्ण गहिंवरलेल्या स्वरानें ते तिला बोलले, ' बाई, मृत्युलोकीं जो प्राणी जन्माला येतो तो मृत्यु पावतच आहे. आजवर या बिचाऱ्या विधवा बाईनें, प्रसंगीं स्वत: एक घांस कमी खाऊन, प्रेमानें तुझें लालनपोषण केलें आहे. तुझें दूध जर तिला मिळालें नाहीं तर तिच्या या गरीबीच्या

स्थितींत तिचें कसें होईल, याचा विचार कर. तुझें त्या मृत्यु पावलेल्या रेडकाबद्दलचें दु:ख विसरून या तुझ्या मालकिणीला पूर्वींसारखेंच तुझें दूध मिळूं देणें हा तुझा धर्म आहे. तो पाळलास तर तुझें पुण्य ईश्वराच्या घरीं रुजूं होईल.'

किती नवलाईची गोष्ट ! त्या म्हशीचें एवढा वेळ एकसारखें चाललेलें हंबरणें स्वामींचे हे शब्द तिच्या कानीं पडतांच एकाएकीं थांबलें ! स्वामींनीं मग त्या रडत बसलेल्या स्त्रीला तपेलें घेऊन बाहेर बोलावलें व म्हशीची धार काढायला तिला सांगितलें. स्वामींच्या तोंडून निघालेल्या नुसत्या या सांत्वनाच्या शब्दांमुळें म्हैस दूध देईल, असें त्या स्त्रीला प्रथम वाटेना. पण त्यांच्या शब्दाला मान द्यावा म्हणून ती तपेली घेऊन म्हशीजवळ आली व तिची धार काढूं लागली. चमत्कार हा कीं, हूं कीं चूं न करतां म्हशीनें आतां धार द्यायला सुरुवात केली व रोजच्याप्रमाणें थोडच्या वेळानें जेवढें मिळावें तेवढें, तपेलीभर दूध त्या स्त्रीला त्या दिवशीं मिळालें !

---

गोष्ट ८ वी

# रामदासस्वामी व आंब्याची फांदी

एकदां ठिकठिकाणीं प्रवास करतां करतां रामदासस्वामी सातारा प्रांतांतल्या मसुर या गांवीं येऊन पोहोंचले. घरोघर आड, गांवाजवळ बारमहा वाहाणारा स्वच्छ पाण्याचा ओढा,

ठिकठिकाणीं विहिरी, एका कोसाच्या अंतरावर कृष्णा नदी, भोंवतालीं सगळीकडे आंबराया व मळे असें हें सुंदर गांव पाहिल्यावर येथें आपला मठ स्थापून स्थायिक व्हावें असें स्वामींनीं ठरवलें. येथें राहूं लागल्यावर दरवर्षी आपलें आराध्य दैवत जें धनुर्धारी राम त्याचा उत्सव या गांवांत नव्यानें त्यांनीं सुरू केला. एकदां हा उत्सव सुरू झाल्यावर रामाची मूर्ति ज्या सिंहासनावर बसवून देवालयांत नेण्यांत येई त्या सिंहासनाच्या निशाणाआड मार्गांतील एक आंब्याच्या झाडाची फांदी येऊं लागली. पण गांवांतला मुसलमान अधिकारी ती तोडावयाला स्वामींना परवानगी देईना. पण रामदासस्वामी आपल्या आराध्य दैवताच्या उत्सवाआड येणारी ही लहानशी उणीवसुद्धां गप्प राहून सहन करावयाला तयार नव्हते. त्यांनीं आपली ही अडचण थेट विजापूरच्या सुलतानाला पत्र लिहून कळवली व त्याची लेखी परवानगी आणवून मार्गांत आडवी येणारी ही आंब्याची फांदी त्यांनीं प्रथम तोडवली व मग यथासांग हा उत्सव पार पाडला.

---

गोष्ट ९ वी

## रामदासस्वामींमुळें राज्यविस्तार

शिवाजीमहाराज केव्हांहि रामदासस्वामींच्या दर्शनाला गेले कीं दर्शनानंतर निरोप घेतांना एखादी देणगी मागून घेण्याचा स्वामींना आग्रह करीत. रामदासस्वामी मग ज्या



मुलुखांत महाराजांचें राज्य नाहीं, तेथला एखादा गांव मागत. शिवाजी महाराजहि मुळींच कां कूं न करतां शत्रूच्या राज्यांतल्या त्या गांवाच्या सनदा स्वामींच्या मठाच्या नांवें करून देत व मग पुढें कांहीं दिवसांनीं त्या मुलुखावर स्वारी करून ते तो जिंकीत व आपल्या राज्याला जोडीत. अशा रीतीनें रामदासस्वामींच्या अशा या मागण्या मराठ्यांच्या राज्यविस्ताराला कारण झालेल्या आहेत !

---

गोष्ट १० वी

## पाषाणाच्या पोटांत बेडकी

एकदां शिवाजी महाराजांनीं आपल्या राज्यांत एक नवा डोंगरी किल्ला बांधण्याचा हुकूम दिला. त्या किल्ल्याचें बांधकाम सुरू झाल्यावर कांहीं दिवसांनीं तें काम कुठवर आलें

आहे, तें पाहावें या इराद्यानें ते त्या ठिकाणीं जावयाला निघाले· वाटेंत एका गांवीं रामदासस्वामींचा मुक्काम होता रामदासस्वामीचें दर्शन घ्यावें व मग पुढें जावें असें ठरवून महाराज स्वामींच्या आश्रमांत गेले. त्यांचें दर्शन घेतल्यावर आपल्याबरोबर येऊन तो किल्ला बांधण्याचें काम चाललें आहे तें अवलोकन करावें अशी शिवाजीमहाराजांनीं त्यांना विनंति केली. ती मान्य करून रामदासस्वामीहि महाराजांसमवेत त्या ठिकाणीं गेले.

ज्या पहाडावर हा किल्ला बांधला जात होता, तेथें हजारों माणसें काम करताहेत असें शिवाजीमहाराजांना दिसलें व इतक्या या माणसांना आपण रोजगाराला लावलें, आपण त्यांचे पोषणकर्ते आहों, असा अहंकाराचा विचार त्यावेळीं त्यांच्या मनांत आला. स्वामींना अंतर्ज्ञानानें तो कळला. थोड्या वेळानें बांधकामाची पहाणी करीत फिरतां फिरतां दोघेहि अशा ठिकाणीं आले कीं तेथें पहाडाचा कांहीं भाग सुरुंग लावून फोडण्याचें काम चाललें होतें व आजूबाजूला सुरुंगानें फुटून निघालेले अजस्र खडक व शिळा पसरल्या होत्या. या ठिकाणीं रामदासस्वामी थोडा वेळ थांबले. तबलदाराला त्यांनीं हांक मारली व एका पुरुषभर उंचीच्या चौकोनी शिळेकडे बोट दाखवून एका विशिष्ट प्रकारानें तिचे मधोमध दोन भाग होतील अशा रीतीनें ती शिळा दुभंग करावयाला त्याला त्यांनीं सांगितलें. शिवाजी महाराज बुचकळ्यांत पडले. स्वामींनीं कोणत्या हेतूनें ही शिळा फोडावयाला सांगितली आहे याचा त्यांना बोध होईना ! थोड्या वेळानें स्वामींनीं सांगितलेल्या पद्धतीनें ती शिळा फोडली गेली व ती दुभंग झाली. शिवाजी-

महाराज व सभोंवतालचे सर्व लोक, शिळेच्या झालेल्या त्या दोन शकलांकडे त्यांची दृष्टि जातांच आश्चर्यचकित झाले. या शिळेच्या मध्यभागीं दोन–तीन पसे एवढेंच पाणी मावेल असा एक खळगा असून त्यांतील पाण्यामध्यें एक लहान बेडकी जिवंत असलेली त्यांना दिसली !



'काय हा चमत्कार !' तें दृश्य पाहून शिवाजीमहाराजांच्या तोंडून उद्गार निघाले. यावर रामदासस्वामी म्हणाले, 'चमत्कार कसला ? ही तुझीच करणी ! येथें काम करणाऱ्या हजारों मजुरांचें तूं पोषण करतोस, मग या एका लहानशा बेडकीचें पोषण करणें हें तुला काय कठीण आहे ? तुझी योग्यताच फार मोठी ! या दगडामध्यें खळगा बनवून त्यांत पाणी घालून या बेडकीचें तूंच पोषण केलें आहेस ! हें इतरांच्या हातून होणें नाहीं !'

आपल्या मनांत नुकताच जो अहंकाराचा विचार येऊन गेला त्या बाबतींत आपल्याला ताळ्यावर आणण्याकरितां रामदासस्वामींनीं हा सर्व प्रसंग घडवून आणला होता, हें आतां शिवाजीमहाराजांना कळून आलें व त्यांनीं आपल्या अहंकारवृत्तीबद्दल स्वामींकडे पश्चात्ताप व्यक्त केला.

---

## गोष्ट ११ वी

# बाळाजी आवजीची आई

शिवाजीच्या काळीं कोंकणांत जंजिरा या बेटावर राज्य करणारा शिद्दी याचा एक क्रूर व जुलमी राजा म्हणून सर्वत्र दुर्लौकिक झाला होता. तो इतका लहरी होता कीं, एखाद्यावर लहानशा कारणावरूनहि त्याची इतराजी होई व मग तो क्रोधाच्या भरांत त्या माणसाला कसलीहि अमानुष शिक्षा ठोठावून मोकळा होई.

एकदां या जंजिऱ्याच्या शिद्दीची प्रत्यक्ष त्याचा दिवाण आबाजी हरि चित्रे याच्यावरच वक्रदृष्टि झाली व या दिवाणाला व त्याच्या भावाला त्यानें ठार केलें. पण एवढी शिक्षा करूनहि त्याचा राग शांत झाला नाहीं. बिचाऱ्या आबाजी हरीची बायको व तिचे तीन लहान मुलगे यांना त्यानें पकडलें व त्यांना दूरदेशीं नेऊन गुलाम म्हणून विकण्याचा त्यानें आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम दिला. त्या काळीं इराणमधील मस्कत हें बंदर गुलामांच्या व्यापाराबद्दल फार प्रसिद्ध होतें. हिंदुस्थानांतील जे राजे आपल्या राज्यांतील अपराधी माणसांना गुलाम म्हणून विकण्याची शिक्षा देत, त्यांना विकण्याकरतां

तारवांतून या मस्कत बंदरांत पाठवण्यांत येई. कारण मस्कतच्या गुलामांच्या बाजारांत अशा या माणसांना चांगला भाव येई. अर्थात् शिद्दीच्या राज्यांतील अधिकाऱ्यांनीं आबाजी हरीची बायको व त्याचीं तीन मुलें यांना मस्कतला नेऊन विकण्याकरतां जंजिऱ्याहून तेथें जावयाला निघालेल्या एका तारवाच्या खलाशांच्या हवालीं केलें.

हें तारूं जंजिऱ्याहून निघाल्यावर बिचाऱ्या आबाजी हरीच्या बायकोच्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. आपल्यावर जणूं आभाळच कोंसळलें असें तिला वाटलें ! कारण मस्कतला गुलामांच्या बाजारांत गुलाम म्हणून आपल्याला विकत घेणारे आपले मालक आपल्याला बाटवून मुसलमान केल्याशिवाय राहाणार नाहींत याचेंच तिला आतां जास्त दुःख वाटूं लागलें. पण ही स्त्री फार हुषार व विचारी होती. तिनें यावेळीं आपला धीर खचूं दिला नाहीं. आपल्याला मस्कतच्या बाजारांत नेऊन विकण्याऐवजीं जवळच्याच राजापूर बंदरांत तारूं थांबवून तेथें विकण्याची तिनें त्या तारवावरच्या खलाशांची डोळ्यांत आंसवें आणून विनवणी केली. त्या खलाशांनाहि तिची व तिच्या लहान मुलांची दया आली. चांगला भाव आला तर राजापूरलाच त्यांना विकून टाकावें असें त्यांनीं ठरवलें व त्या बंदराजवळ पोहोंचल्यावर तेथें त्यांनीं नांगर टाकला. राजापूरचा एक सधन व्यापारी विसाजी शंकर हा आबाजी हरीच्या बायकोचा भाऊ होता त्याला आतां गुप्तपणें निरोप पाठवून आपल्यावर आलेल्या संकटाची तिनें सूचना दिली. विसाजी शंकर बंदरावर आला व आपलें व त्यांनीं विकायला आणलेल्या या माणसांचें नातें आहे, ही गोष्ट त्या खलाशांना

कळूं न देतां, तारवावरील चारहि माणसांना ते सांगतील ती किंमत देऊन त्यानें विकत घेतलें.

अशा रीतीनें या संकटांतून स्वतःची मुक्तता करून घेतल्यावर आबाजी हरीची ही बायको व तिचे, बाळाजी आवजी, चिमणाजी व शामजी हे तिघे मुलगे राजापूरलाच विसाजी शंकरच्या आश्रयानें राहूं लागलीं. यानंतर कांहीं वर्षांनीं शिवाजीमहाराजांची स्वारी राजापूरला आली आहे, हें कळल्यावर बाळाजी आवजीनें महाराजांना एक पत्र पाठवलें व त्यांच्या पदरीं आपल्याला नोकरी देण्यांत यावी अशी त्या पत्रांत त्यांची प्रार्थना केली. त्या पत्रांतलें बाळाजी आवजीचें सुंदर हस्ताक्षर पाहून महाराज खूष झाले व त्याला बोलावून घेऊन कारकुनीच्या कामावर त्याला नेमलें. पुढें बाळाजी आवजीची बुद्धिमत्ता व त्याचा इमानीपणा या गुणांचा अनुभव आल्यावर महाराजांनीं दरबारांतील चिटणीस या उच्च पदावर त्याची नेमणूक केली. खंडो बल्लाळ हा बाळाजी आवजीचा मुलगा. मराठी राज्याची सेवा बजावीत असतां बाळाजी आवजी व खंडो बल्लाळ यांच्या अंगचे प्रगट झालेले स्वामीनिष्ठा व त्याग हे गुण इतिहासामध्यें सुवर्णाक्षरांनीं लिहिले गेले आहेत. बाळाजी आवजीच्या आईनें आपल्या आयुष्यांतील एका अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं आपला धीर खचूं न देतां प्रसंगावधान राखून, बुद्धिकौशल्यानें आपल्यावर आलेल्या एका महान् संकटावर मात केली, म्हणूनच बाळाजी आवजी व खंडो बल्लाळ हीं नवरत्नें मराठी राज्याला त्या काळीं लाभलीं !

गोष्ट १२ वी

# कोरा कागद वाचणारे बाळाजी आवजी

शिवाजीमहाराजांनीं बाळाजी आवजीची चिटणिशीच्या पदावर नेमणूक केल्यावर त्याचें या कामांतील कौशल्य पाहून ते नेहमीं खूष होत. बाळाजी आवजी हे मजकूर जुळविण्यांत फार वाकबगार होते. महाराज नुसता तोंडीं थोडक्यांत त्याला मसुदा सांगत, त्या आधारें बाळाजी संपूर्ण पत्र किंवा खलिता लिहून काढून तो त्यांना त्यांच्या अखेरच्या मंजुरीकरतां वाचून दाखवी. अशीं बाळाजी आवजीनें तयार केलेलीं पत्रें व खलिते इतकीं चांगलीं असत कीं, त्यांत एका अक्षराचाहि फेरफार करण्याची महाराजांना कधींहि जरूर वाटत नसे.

एकदां सकाळीं दरबार भरला असतां महाराजांनीं एका तांतडीच्या खलित्याचा मसुदा तोंडीं बाळाजी आवजीला ऐकवला व तो लिहून तयार करावयाला त्याला सांगितलें. त्या दिवशीं बाळाजी आवजीला सबंध दिवसभर इतर कामांपुढें हा खलिता लिहून काढायला वेळ मिळाला नाहीं. रात्रीं महाराजांनीं बाळाजी आवजीला बोलावलें व तो खलिता वाचून दाखविण्यास सांगितलें.

बाळाजीच्या पोटांत धस्स झालें. कधींहि न आलेला, महाराज आपल्यावर नाराज होण्याचा प्रसंग त्या दिवशीं आला असें त्यास वाटलें. पण या अडचणींतून वाट काढण्याची एक

युक्ति त्यास त्यावेळीं सुचली. महाराजांसमोर एक कोरा कागद चाश‍ा अंतरावर तो उभा राहिला व बाजूला दिवटीवाला उभा होता, त्या त्याच्या हातांतील दिवटीच्या प्रकाशांत त्या कोऱ्या कागदावर ‘न लिहिला गेलेला’ सबंध खलिता जसा असावयास पाहिजे होता, तसा तोंडीं वाचून त्यांस ऐकवला. हा महत्त्वाचा खलिता इतक्या चांगल्या रीतीनें तयार केल्याबद्दल महाराजांनीं यावेळीं त्यास शाबासकी दिली. महाराजांच्या तोंडून बाळाजी आवजीबद्दल निघालेले हे शाबासकीचे शब्द ऐकून दिवटीवाल्याला हंसू आलें. कारण बाळाजीच्या हातांतील कागदावर एकहि अक्षर लिहिलेलें नव्हतें हें त्यानें पाहिलें होतें. दिवटीवाला हंसतो आहे, हें पाहिल्यावर महाराजांना त्याच्या या हंसण्याचें कारण विचारून घ्यावेंसें वाटलें. पण दिवटीवाला भिऊन गेला व महाराजांना आपल्या हंसण्याचें कारण प्रथम सांगेना. पण महाराजांनीं त्याला दरडावलें तेव्हा त्याचा निरुपाय होऊन त्यानें बाळाजी आवजीच्या हातांत कोरा कागद होता हें आपल्याला हंसू येण्याचें कारण होतें, ही गोष्ट त्यांजकडे उघड केली. बाळाजी आवजीनेंहि आतां आपला अपराध कबूल केला व महाराजांची क्षमा मागितली. पण महाराज बाळाजीवर रागावले नाहींत. या प्रसंगामुळें त्यांच्या प्रत्ययाला आलेली बाळाजीची ही धारणाशक्ति पाहून ते त्याजवर अधिकच खूष झाले !

---

## गोष्ट १३ वी

# कुत्र्याच्या पोटास बांधलेला औरंगजेबाचा खलिता !

विजापूरच्या राज्याविरुद्ध बंड पुकारून शिवाजीनें स्वराज्यस्थापनेचा उद्योग सुरू केल्यावर विजापूरच्या सुलतानानें शहाजीराजांना विजापूरला बोलावून आणलें व शिवाजीच्या बंडाळीबद्दल त्यांस शिक्षा म्हणून कैदेंत ठेवलें. इतकेंच नव्हे तर शिवाजीनें बंडाळी थांबवून आपणांला शरण आलें पाहिजे; नाहींतर तुम्हांला भिंतींत चिणून ठार केलें जाईल अशी शहाजीराजांना या सुलतानानें धमकी दिली.

आपले वडील अशा या प्राणसंकटांत सांपडले आहेत, हें कळल्यावर स्वराज्य स्थापण्याचा उद्योग तर सोडून द्यावयाचा नाहीं, पण शहाजीराजांवर आलेलें संकट दूर करावयाचें असें शिवाजीनें ठरवलें व त्याकरितां त्यानें एक नामी मनसुबा रचला.

दिल्लीच्या शहाजहान बादशहानें यावेळीं आपला मुलगा मुरादबक्ष यास दक्षिणेंतील कारभार पहाण्याकरितां नेमलें होतें. त्याच्याकडे शिवाजीनें यावेळीं संधान बांधलें व त्यास असें कळवलें कीं, आपण शहाजहान बादशहाची नोकरी पत्करायला तयार आहों; फक्त विजापूरच्या सुलतानाच्या कैदेंत असलेल्या आपल्या वडिलांच्या जिवाला धोका पोहोंचूं नये, अशी तजवीज बादशहानें करावी, एवढीच आपली त्यांजकडे विनंति आहे. शिवाजीचा हा निरोप मुरादबक्षनें शहाजहानला कळवला, तेव्हां हा दिल्लीचा बादशहा खूष झाला.

ज्यानें विजापूरच्या राज्याविरुद्ध बंड सुरू केलें होतें, अशा शिवाजीसारख्या शूर माणसानें आपली नोकरी पत्करली तर त्याच्या मदतीनें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें जिकण्याचें आपलें काम सुलभ होईल, असें त्यास वाटलें व त्यानें शिवाजीची ही विनंति मान्य करून शहाजीराजांची कैदेंतून सुटका करा, असा खलिता विजापूरच्या सुलतानाला पाठविला. तो खलिता मिळाल्यावर विजापूरचा सुलतान घाबरला. आपलें राज्य जिंकण्याचा ज्याचा इरादा आहे, त्या शहाजहान बादशहाला नाराज केलें तर त्याच्या स्वारीचें संकट आपल्यावर अधिकच लौकर ओढवेल, असा पोक्त विचार करून त्यानें दिल्लीच्या बादशहाच्या शब्दाला आपण मान दिला असें दाखवण्याकरतां शहाजीची भिंतींत चिणून ठार करण्याची शिक्षा रद्द केली व कैदेंतूनहि त्यांना सोडलें.

यानंतर थोड्याच दिवसांनीं शहाजहान बादशहा फार आजारी पडला आहे व त्याच्या आयुष्याचा शेवट जवळ आला आहे हें वर्तमान कानांवर आल्यावर औरंगजेब सैन्यासह तांतडीनें दिल्लीला गेला व दिल्लीची गादी शहाजहान आपला दुसरा भाऊ मुरादबक्ष याला देईल या धास्तीनें त्यानें आपल्या बापालाच पकडून कैदेंत ठेवलें व आपण ती गादी बळकावली. यानंतर औरंगजेबानें एका जासूदाकरवीं शिवाजीला एक खलिता पाठवला. या खलित्यांत त्यानें शिवाजीला असें फर्माविलें कीं, ज्याअर्थीं दिल्लीच्या गादीवर आतां शहाजहान बादशहा नाहीं व आपण ती गादी मिळवली आहे, त्याअर्थीं शिवाजीनें यापुढें शहाजहान बादशहाऐवजीं आपली हुकमत मानावी व आपली चाकरी करावी.

खलित्यांतला हा मजकूर वाचल्यावर प्रत्यक्ष आपल्या पित्याला कैदेंत ठेवून त्याची गादी बळकावणाऱ्या औरंगजेबाच्या या दुष्ट कृत्याबद्दल शिवाजीला त्याचा एवढा तिरस्कार वाटला



कीं, तो व्यक्त करण्याकरतां बादशहाचा तो खलिता शिवाजीनें एका कुत्र्याच्या शेपटाला बांधला व त्या कुत्र्याला सबंध पुणें शहरांत फिरवलें.

औरंगजेबाच्या जासुदाच्या डोळ्यांदेखत त्याच्या खलित्याची शिवाजीनें केलेली ही विटंबना जेव्हां त्या जासुदानें परत दिल्लीला गेल्यावर औरंगजेबाला कळवली, तेव्हा औरंगजेबाला काय वाटलें असेल, याची कल्पनाच केलेली बरी !

गोष्ट १४ वी

# कात्रजच्या घाटावरील मशाली

शिवाजी आपली ताबेदारी पत्करावयाला कबूल नाहीं व तो दक्षिणेंतील आपली सत्ता नष्ट करण्याच्या उद्योगाला लागला आहे हें पाहिल्यावर त्याला वठणीवर आणण्याचा एक निकराचा प्रयत्न करून पहावा असें औरंगजेब बादशहानें ठरवलें व शाहिस्तेखान नांवाच्या आपल्या एका शूर सरदाराला मोठी फौज देऊन शिवाजीचें पारिपत्य करावयाला दक्षिणेंत पाठवलें.

शाहिस्तेखानानें दक्षिणेंत पोंचल्यावर शिवाजीच्या राज्यांतील मुलूख व किल्ले एकसारखे घेण्याचा सपाटा चालवला. अखेरीस तो पुण्याला येऊन पोहोंचला व तेथें त्यानें आपल्या सैन्यासह तळ दिला. पुण्यांत शिवाजीचा वाडा होता, तो ताब्यांत घेऊन शाहिस्तेखान त्या वाड्यांतच आतां राहूं लागला.

सिंहगड किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तानें रहात असलेल्या शिवाजीनें यावेळीं शाहिस्तेखानाला चांगली अद्दल घडवण्याची एक मसलत योजिली.

एक दिवस मध्यरात्रीं बरोबर दोनशें मावळे घेऊन शिवाजी चपळाईनें पुण्याला येऊन पोहोंचला. शाहिस्तेखान व त्याचें सैन्य यावेळीं बेसावध होतें. थोडेसे लोक बरोबर घेऊन शिवाजीनें शाहिस्तेखान राहात होता त्या वाड्याला आतां

गराडा घातला व आंत शिरून शाहिस्तेखानाला ठार करण्याकरतां तो त्याला हुडकूं लागला. पण शिवाजी वाड्यांत शिरला आहे, आपली आतां धडगत नाहीं, असें पाहिल्यावर शाहिस्तेखान गर्भगळित झाला व एका खिडकींतून बाहेर उडी घेऊन निसटून जाऊं लागला. पण शिवाजीनें त्याला पहातांच त्याच्यावर आपली तलवार चालवली व तो जरी पळून गेला तरी त्याच्या हाताचीं तीन बोटें छाटलीं. इतक्यांत शाहिस्तेखानाचे बाहेर असलेलें सैन्य सावध झालें व शिवाजीच्या मावळ्यांवर चालून आलें. पण त्या सैन्याच्या हातावर तुरी देऊन शिवाजीनें आपल्या लोकांसह परत सिंहगडाकडे दौडावयास सुरुवात केली. शाहिस्तेखानानें मग शिवाजीचा पाठलाग करण्याचा आपल्या सैन्याला हुकूम केला. त्याप्रमाणें तें सैन्य त्याला पकडण्याच्या ईर्षेनें कात्रजच्या घाटाच्या दिशेनें भरधांव दौडूं लागलें. कारण त्यांना दूर अंतरावर त्या कात्रजच्या रस्त्यावर धांवत्या मशालींचा उजेड दिसत होता. थोड्या वेळानें मोंगलांचें हें सैन्य जेथें त्या मशाली प्रकाशत होत्या, तेथें येऊन पोहोंचलें. पहातात तों काय? ज्यांच्या शिगांना पेटवलेल्या मशाली बांधल्या आहेत, असे वीस–पंचवीस बैल, त्या रस्त्यावरून सैरावैरा धांवतांना त्यांना दिसले. मोंगल सैन्याला चकवण्याकरतां शिवाजीनें योजिलेली ही युक्ति फार चांगली साधली. कारण एवढ्या वेळांत विरुद्ध दिशेला असलेल्या सिंहगड किल्ल्यावर शिवाजी आपल्या लोकांनिशीं सुरक्षित जाऊन पोहोंचला होता!

---

गोष्ट १५ वी

# शिवाजीची आग्र्याहून सुटका

शिवाजी दक्षिणेंतील आपल्या मुलुखाचे एकसारखे लचके तोडतो आहे व आपल्या सत्तेला जुमानीत नाहीं असें पाहिल्यावर औरंगजेबानें शेवटीं शिवाजीला नेस्तनाबूत करण्याच्या कामगिरीवर आपला जो सर्वांत मोठा सेनापति राजा जयसिंग, याला नेमलें. या जयसिंगाच्या जोडीला औरंगजेबानें दिल्लीच्या दरबारांत असलेला दुसरा एक शूर सरदार जो दिलेरखान याला दिलें.

जयसिंग व दिलेरखान पायदळ, घोडदळ, तोफखाना अशा जंगी फौजफाटयानिशीं दक्षिणेंत येऊन पोहोंचले व शिवाजीचा मुलूख घ्यावयाला त्यांनीं सुरुवात केली. बादशहाचे हे सरदार सगळीकडे आपला मुलूख काबीज करून आपला कोंडमारा करताहेत, असें पाहिल्यावर शिवाजीनें त्यांच्याशीं तहाचें बोलणें सुरू केलें. मोंगलांची ताबेदारी व जहागीर पत्करून औरंगजेबाची यापुढें शिवाजीनें एकनिष्ठेनें सेवा बजवावी व ही गोष्ट बादशहाच्या मुलाखतीला शिवाजीनें आग्र्याला जाऊन त्याच्याकडे कबूल करावी, अशी जयसिंगानें त्यावेळीं अट घातली. ती शिवाजीनें वरकरणीं मान्य केली व तो बादशहाची भेट घेण्याकरतां आपला मुलगा संभाजी याच्यासमवेत आग्र्याला गेला.

जयसिंगाचा मुलगा रामसिंग हा दिल्लीच्या दरबारांत मोठ्या हुद्द्यावर होता. शिवाजी हा मोठा मानी पुरुष आहे,

मानपान याबाबतींत त्याच्या मनाला दुखवणारी कोणतीहि गोष्ट होऊं देऊं नये, असें राजा जयसिंगानें आपल्या या मुलाला पत्र लिहून कळवलें होतें व त्याप्रमाणें शिवाजीला बहुमानानें वागवण्याची रामसिंग काळजी घेत होता. पण बादशहाच्या मनांतला शिवाजीवर इतके दिवस असलेला राग गेला नव्हता. त्यानें दरबारांत शिवाजी त्याच्या मुलाखतीला गेला, तेव्हां कनिष्ठ दर्जाच्या सरदारांच्या रांगेमध्यें त्याला उभें केलें. शिवाजीला या गोष्टीचा संताप आला. त्यानें रामसिंगाजवळ या प्रकाराबद्दल कडक शब्दांत आपली चीड व्यक्त केली व बादशहाच्या सिंहासनाकडे पाठ करून तो तडक दरबाराबाहेर पडला.

शिवाजी आपल्याविरुद्ध बेदिल झाला आहे, तेव्हां तो आपल्या आग्र्याच्या वास्तव्यांत काय आततायी प्रकार करील याचा नेम नाहीं, अशा धास्तीनें औरंगजेबानें यानंतर शिवाजीची ज्या राजवाड्यांत रहावयाची व्यवस्था केली होती तेथें पक्क्या चौक्या बसवल्या.

बादशहानें आपल्याला नजरकैदेंत ठेवलें आहे असें पाहिल्यावर त्याच्या या कपटावर मात करण्याचें मग शिवाजीनें ठरवलें. थोड्या दिवसांनीं आपण आजारी पडलों आहों, अशी बाहेर सगळीकडे बातमी पसरवून, चौकीदारांच्या नजरेस न पडतां शिवाजी दिवसभर बिछान्यावर पडून राहूं लागला. याचवेळीं शहरांतील देवस्थानें, मशिदी, साधु, बैरागी, फकीर, अमीर, उमराव यांना भेटीदाखल रोज मोठमोठाले पेटारे भरभरून मिठाई पाठवायला त्यानें सुरुवात केली. सुरुवातीला पहारेकरी हे पेटारे उघडून पहात व त्यांत मिठाईच आहे,

अशी खात्री करून घेऊन ते बाहेर जाऊं देत; पण नंतर त्यांना हे पेटारे उघडून पहाण्याची जरुरी वाटेनाशी झाली. एवढें झाल्यावर एक दिवस शिवाजी व संभाजी दोन पेटाऱ्यांमध्यें बसले व मागेंपुढें आणखीं दोनचार मिठाईनें भरलेले पेटारे ठेवले. अशा युक्तीनें चौकीदारांना संशय येऊं न देतां, ते राजवाड्याबाहेर पडले.



शहराच्या बाहेर पडल्यावर तेथें जे दोन चपळ घोडे तयार ठेवण्याची शिवाजीनें आधींच तजवीज केली होती, त्यांवर शिवाजी व संभाजी स्वार झाले. संभाजीनें आपल्यापासून अलग होऊन कांहीं विश्वासू माणसांच्या सोबतीनें वेष पालटून दक्षिणेकडे प्रवास करावा व आपणहि तसाच वेष पालटून दुसऱ्या एका मार्गानें हा प्रवास करावा, असें शिवाजीनें यावेळीं ठरवलें, त्याचप्रमाणें सरळ मार्गानें हा प्रवास

करण्याऐवजीं मथुरा, वाराणसी, प्रयाग, गोंडवण असा वेडा-वांकडा लांबचा प्रवास करण्याची त्या दोघांनींहि सावधगिरी घेतली. शिवाजीच्या अशा या चतुराईमुळें बादशहाचें सैन्य जेव्हां हे पितापुत्र एकत्र सरळ मार्गानें प्रवास करीत असतील अशा धोपट विचारानें त्यांचा पाठलाग करूं लागलें तेव्हां त्यांची फसगत होऊन हात हलवीत त्या सैन्याला परत यावें लागलें.

शिवाजी व संभाजी यांना औरंगजेबानें आग्र्याला कैदेंत ठेवलें आहे, हें वर्तमान शिवाजीच्या राज्यांत येऊन पोहोंचल्यावर सर्व लोक काळजींत पडले होते. पण कांहीं दिवसांनीं वेषांतर केलेले शिवाजी व संभाजी अचानक रायगडावर येऊन पोहोंचले व ही सुवार्ता ऐकल्यावर शिवाजीची सर्व प्रजा हर्षभरित झाली !

---

गोष्ट १६ वी

## शिवाजीमहाराजांची एका गोठ्यांत वस्ती

दिल्लीच्या बादशहाच्या कैदेंतून मोठ्या युक्तीनें निसटून शिवाजीमहाराज बैराग्याच्या वेषांत दक्षिणेकडे प्रवास करीत असतांना कडवली प्रांतांतील एका खेड्यांत येऊन पोहोंचले. तेथें ते एका गरीब कुळवाड्याच्या गोठ्यांत वसतीला राहिले. त्या कुळवाड्याची म्हातारी आई या प्रसंगीं कष्टी होऊन महाराजांना म्हणाली, 'तुम्ही बैरागी. तुम्ही आल्यावर तुम्हांला

अन्न द्यावें, हा आमचा धर्म. पण घरांत अन्नच नाहीं, त्याला आम्ही काय करणार? बाहेरदेशींची फौज आली, त्यांनीं आमचा सर्व गांव लुटून नेला!' यावर महाराजांनीं 'कुठली फौज आली होती' असा तिला प्रश्न केला. 'शिवाजीराजाचा तेलंगराव सरदार फौज घेऊन आला. त्यानें आमचा सबंध गांव लुटला. शिवाजी दिल्लीला गेला आहे. त्याचें तेथला बादशहा कां पारिपत्य करीत नाहीं? त्याच्या फौजेचा आम्हां गरिबांना फारच उपद्रव होतो.' असें तिनें त्यांच्या या प्रश्नाला उत्तर दिलें. मग त्या गांवाहून पुढील प्रवासाकरतां निघण्यापूर्वीं त्या बाईचें नांवगांव व इतर सर्व खाणाखुणा महाराजांनीं विचारून घेतल्या.

थोड्या दिवसांनीं स्वदेशीं राजगडावर जाऊन पोहोंचल्यावर त्या कुळवाडी बाईचें व तिच्या गांवांतल्या इतर माणसांचें, आपल्या फौजेच्या स्वारीमुळें जें नुकसान झालें आहे, त्याची भरपाई करण्याचा महाराजांनीं आपल्या कारभाऱ्यांना हुकूम दिला.

---

गोष्ट १७ वी

## कढी भोंवतालीं भाताचें आळें

बादशहाच्या बंदीखान्यांतून मोठ्या हिकमतीनें आपली सुटका करून घेतल्यावर शिवाजीमहाराज वेषांतर करून दक्षिणेकडे यावयाला निघाले. प्रवास करतां करतां एके दिवशीं

दुपारीं खानदेशमधल्या एका गांवाच्या वेशीवर ते येऊन पोहोंचले. त्यांना सपाटून भूक लागली होती. वेशीजवळ त्यांना एक घर दिसलें. तेथें ते गेले व अंगणांत एका झाडाला आपला घोडा बांधून ठेवून त्या घरांतल्या स्त्रीकडे त्यांनीं भोजनाची इच्छा व्यक्त केली. ते यावेळीं साधूच्या वेषांत होते. आपण शिवाजीराजे हें तिला त्यांनीं कळूं दिलें नाहीं. त्या स्त्रीनें त्यांचें पान वाढलें. ती कढी वाढूं लागली तेव्हां कढीभोंवतीं भाताचें आळें करण्याची साधी गोष्ट महाराजांना यावेळीं सुचली नाहीं. कढी केळीच्या पानाबाहेर वाहून जाऊं लागली. तें पाहून ती स्त्री हंसून त्यांना म्हणाली, 'साधुमहाराज, तुम्हीं त्या शिवाजी राजासारखेच दिसतां. त्या राजाला जसें आपलें राज्य सुरक्षित रहावयाचें असेल तर शत्रूकडून जिंकलेल्या मुलखाभोंवतीं किल्ल्याचें कडें उभारलें पाहिजे, ही साधी गोष्ट कळत नाहीं, तसेंच तुम्हांलाहि कढीभोंवतीं भाताचें आळें केलें पाहिजे, हें माहीत नाहीं !'

शिवाजीमहाराजांना त्या स्त्रीच्या या खुबीदार बोलण्याचें मोठें कौतुक वाटलें. पुढें आपल्या राज्यांत पोहोंचल्यावर आपल्या कारभाऱ्याला त्या स्त्रीला आपली भेट म्हणून कांहीं मौल्यवान वस्तु पाठवायची त्यांनीं आज्ञा केली.

---

गोष्ट १८ वी

# कृष्णाजीपंताची कामगिरी

शिवाजीमहाराज संभाजीला घेऊन आग्र्याहून निसटल्यावर ते मथुरेला थांबले व तेथें कृष्णाजीपंत नांवाचा एक ब्राह्मण

रहात असे, त्याच्याकडे संभाजीला सुरक्षित दक्षिणेंत आणून पोहोंचविण्याची कामगिरी त्यांनीं सोंपवली.

कृष्णाजीपंत व त्याचे दोघे बंधु काशीराऊ व विसाजीपंत यांची शिवाजीमहाराजांवर फ़ार भक्ति होती. त्यांनीं थोडे दिवस वेषांतर केलेल्या संभाजीला आपल्या घरीं ठेवून घेतलें व मग ते तिघेहि त्याला घेऊन मोठ्या सावधगिरीनें दक्षिणेकडील प्रवास करूं लागले. त्यांना हा प्रवास औरंगजेबाच्या राज्यांतून करावा लागल्यामुळें गांवोगांव मुसलमान अधिकारी त्यांना हटकूं लागले. त्यांना चकवण्याकरतां कृष्णाजीपंतानें यावेळीं एक नामी युक्ति योजिली. संभाजीला जानवें घालावयाला व धोतर नेसावयाला लावून ठिकठिकाणीं संशयानें त्यांना अटकाव करणाऱ्या मुसलमान अधिकाऱ्यांना तो आपला भाचा आहे असें ते सांगूं लागले. अशा रीतीनें गांवोगांवच्या मुसलमान अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फ़ेंकून त्यांनीं सुरक्षितपणें संभाजीसह रायगड गांठला. त्यांनीं इतक्या निष्ठेनें व चतुराईनें ही महत्त्वाची कामगिरी पार पाडलेली पाहून महाराज त्यांजवर खूष झाले व या तिघांहि बंधूंना त्यांनीं 'विश्वासराव' असा समर्पक किताब बहाल केला. त्याचप्रमाणें त्यांना दहा हजारांची आपल्या राज्यांत जहागीर दिली. कृष्णाजीपंत व त्याचे दोघे बंधु मग आपल्या कुटुंबांतील सर्व माणसांसह शिवाजीच्या राज्यांतच स्थायिक झाले.

गोष्ट १९ वी

# शिवाजीच्या शेल्यामुळें फुटलेलें गुपित

एकदां मोंगलांच्या ताब्यांत असलेला प्रबळगड हा बराच काळ हातीं येत नसलेला बळकट किल्ला कांहीं झालें तरी सर करावा, या ईर्षेनें महाराज स्वतः सैन्य घेऊन गेले व या किल्ल्याला त्यांनीं वेढा दिला.

केशरसिंग नांवाचा एक शूर रजपूत सरदार या किल्ल्याचा किल्लेदार होता. त्यानें मोठ्या निकरानें बरेच दिवस हा किल्ला लढवला, पण महाराजांनीं शेवटीं त्याला जेरीला आणलें व या लढयांत केशरसिंग ठार होऊन हा किल्ला मराठयांच्या ताब्यांत आला.

किल्ला हस्तगत झाल्यावर तो सबंध एकदां पाहून घ्यावा म्हणून महाराज पालखींत बसून निघाले. जातां जातां एका ठिकाणीं बोरीची फांदी महाराजांच्या शेल्याला लागली व तो शेला खालीं जमिनीवर पडला. महाराजांनीं पालखी थांबवायला सांगितली व ज्या ठिकाणीं शेला पडला होता तेथें खणण्याची आपल्या सेवकांना आज्ञा केली. खणतां खणतां तेथें खालीं जमिनींत पुरलेला मोहरांचा हंडा सांपडला !

जेथें आपला शेला पडला तेथें कांहीं तरी गुप्त धन असलें पाहिजे हें महाराजांना कसें कळलें, या विचारानें किल्ल्यावरील सर्व लोक आश्चर्यचकित झाले !

## गोष्ट २० वी

# बहिर्जी नाईक

शिवशाहीचा इतिहास, शिवछत्रपतींच्या व स्वराज्याच्या सेवेसाठीं रणांगणावर अलौकिक शौर्य गाजवणाऱ्या व प्रसंगीं धारातीर्थीं देह ठेवणाऱ्या अनेक समशेरबहाद्दरांच्या स्फूर्तिदायक कृतींनीं भूषित झाला आहे. या वीर-श्रेष्ठांच्या मालिकेंत ज्याला उच्च स्थान दिलें पाहिजे, इतकी ज्याची कामगिरी शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगामध्यें बहुमोल ठरली, पण ज्याला तलवारबहाद्दर असें म्हणतां येणार नाहीं, असा एक त्या काळचा शिवाजीचा स्वामिनिष्ठ सेवक म्हणजे बहिर्जी नाईक हा होय.

बहिर्जी नाइकाचें मूळ आडनांव जाधव असें होतें. जेजुरीजवळच्या एका खेड्यांत त्याचा जन्म झाला. तो खंडोबाचा भक्त होता. वयांत येतांच त्यानें शिवाजीच्या पदरीं नोकरी मिळवली. त्याचें बुद्धिचातुर्य व शारीरिक चापल्य हे गुण पाहिल्यावर शत्रूच्या राज्यांत जाऊन तेथें हेरगिरी करण्याची कामगिरी पार पाडण्यांत त्याचा चांगला उपयोग होईल, असें शिवाजीमहाराजांना वाटलें व त्या कामावर त्यांनीं त्याची नेमणूक केली. शिवाजीची त्याच्याबद्दलची ही पारख किती योग्य होती, हें पुढें बहिर्जीनें आपल्या सबंध हयातींत, त्याच्यावर शिवाजीनें सोंपवलेलें प्रत्येक काम, त्यांत कधींहि अपयश न मिळवतां, किती शिताफीनें पार पाडलें, हें पाहिल्यावर दिसून येतें. त्याला हिंदुस्थानांतल्या अनेक भाषा अवगत होत्या. शिवाय बहुरूपीपणांत तर त्याचा हातखंडा

होता. कधीं बैरागी तर कधीं फकीर, कधीं टाळकरी, कधीं तमासगीर तर कधीं गोंधळी अशा अनेक वेषांमध्यें तो शत्रूच्या प्रदेशांत संचार करी व शिवाजीला हवी असलेली तेथली बारीकसारीक सर्व माहिती आणी. ती मिळाली म्हणजे शिवाजीचें त्या प्रदेशावर धाड घालून तो लुटण्याचें किंवा काबीज करण्याचें काम सुकर होई.

बहिर्जीनें हेरगिरीचीं जीं अनेक चाणाक्षपणाचीं कृत्यें केलीं, तीं सर्व इतिहासांत नमूद झालेलीं आहेत. त्या सर्वांमध्यें जालनापूर येथें मोंगलांबरोबर झालेल्या लढाईंत त्यानें जी अमोल कामगिरी बजावली ती चिरस्मरणीय ठरली आहे. कारण या लढाईमध्यें शिवाजीवर प्राणसंकट येऊन ठेपलें होतें, तें बहिर्जी नाईक त्या प्रसंगीं शिवाजीबरोबर होता म्हणूनच टळलें.

सन १६७९ मध्यें शिवाजीनें मोंगलांचें नामांकित शहर जालनापूर हें लुटलें व तेथें मिळालेली प्रचंड लूट घेऊन परत आपल्या राज्यांत यावयाला तो निघाला. पण मोंगलांचा सेनापति रणमस्तखान हा मोठी फौज घेऊन यावेळीं शिवाजीचा पाठलाग करूं लागला. त्यानें संगमनेरजवळ शिवाजीच्या सैन्याला गांठलें. तीन दिवसपर्यंत शिवाजीचा सरदार सिधोजी निंबाळकर यानें मोंगलांच्या या सैन्याबरोबर निकराचा सामना दिला व त्याला अडवून धरलें. पण या लढ्यांत निंबाळकर मारला गेला. त्यानंतर संताजी शत्रूच्या सैन्याबरोबर लढूं लागला. पण त्याचाहि टिकाव लागला नाहीं व त्यालाहि या लढाईंत माघार घ्यावी लागली. लुटींत मिळविलेला खजिना घेऊन शिवाजीमहाराज थोड्याशा लोकांनिशीं पुढें निघाले

होते; पण त्यांचाहि पाठलाग करून रणमस्तखानानें त्यांना कोंडींत पकडलें. शत्रूच्या हातीं सांपडण्याचा बांका प्रसंग त्यांच्यावर यावेळीं येऊन ठेपला. पण बहिर्जी नाइकाची हुषारी यावेळीं त्यांच्या कामाला आली. बहिर्जी नाइकाला या भागांतील डोंगर–पठारांवरील व दऱ्याखोऱ्यांतील सर्व वाटांची चांगली माहिती होती. अशाच एका गुप्त वाटेनें त्यानें शिवाजीमहाराजांना त्यांच्याबरोबर असलेल्या खजिन्यासह पट्टागड म्हणून एक किल्ला होता, तेथें सुरक्षित आणून पोहों-चविलें. तेथें पोहोंचल्यावर शिवाजीला मोंगलांच्या पाठलागाची भीति राहिली नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं शिवाजीमहाराज बिनधोक रायगडावर येऊन पोहोंचले. ज्या किल्ल्यांत आसरा मिळाल्यामुळें आपल्यावर आलेलें प्राणसंकट टळलें, त्या या पट्टागड किल्ल्याला, या प्रसंगाच्या स्मरणार्थ त्यांनीं पुढें 'विश्रामगड' हें नांव दिलें.

---

गोष्ट २१ वी

## शिवाजीमहाराजांची कडक शिस्त

एकदां शिवाजीमहाराज चाफळला रामदासस्वामींची भेट घ्यावयाला चालले होते. वाटेंत त्यांना पन्हाळा किल्ला लागला. तेव्हां आपण किल्लेदारांना घालून दिलेली शिस्त या पन्हाळ्याच्या किल्ल्यांत कितपत पाळली जाते, हें पाहाण्याचें त्यांनीं ठरवलें. त्या मध्यरात्रीच्या वेळीं घाट चढून त्यांनीं या किल्ल्याचा तट गांठला. मग बाहेरून हांका मारून शिवाजीचे



स्वार किल्ल्याच्या हवालदाराला म्हणाले, ‘ महाराज आले आहेत. आमच्या मागें शत्रूचें सैन्य लागलें आहे. तेव्हां किल्ल्याचा दरवाजा उघडा व आम्हांला आंत घ्या.’ पण हवालदार दरवाजा उघडायला तयार होईना ! तेव्हां स्वतः महाराजांनीं त्याला बाहेरून सांगितलें कीं, ‘ रात्रीं किल्ल्याचा दरवाजा उघडूं नये ही आज्ञा आमची, पण आतां आम्हीच सांगतों कीं, यावेळीं दरवाजा उघडायला आमची परवानगी आहे, तरी तो लवकर उघडा.’ पण प्रत्यक्ष महाराजांनीं असें सांगितलें तरी दरवाजा न उघडतां त्या हवालदारानें या गोष्टीची किल्लेदाराला वर्दी दिली. मग किल्लेदार व किल्ल्यावरचे इतर अधिकारी दरवाजाजवळ येऊन महाराजांना म्हणाले, ‘ आपण महाराज असलां, तरी आपण एकदां घालून दिलेला नियम

आम्हांला आपल्या बाबतींतसुद्धां यावेळीं मोडतां येत नाहीं. शत्रु आल्यास त्यावर येथून तटावरच्या तोफा डागून त्याला आम्ही पहांट होईपर्यंत रोखून धरूं व मग सकाळीं दरवाजा उघडून आपल्याला किल्ल्यांत घेऊं.'

अशा रीतीनें शिवाजीमहाराज व त्यांच्यावरोबर असलेले स्वार यांना सकाळ होईपर्यंत किल्ल्याच्या तटाबाहेर थांबावें लागलें. नंतर दरवाजा उघडल्यावर महाराजांनीं जेव्हां किल्ल्यांत प्रवेश केला, तेव्हां किल्लेदार म्हणाला, 'आम्ही अपराधी, काय शिक्षा करणें असेल ती करावी.'

पण त्या किल्लेदाराला व किल्ल्यावरच्या इतर अधिकाऱ्यांना शिक्षा करण्याऐवजीं शिवाजीमहाराजांनीं त्या सर्वांना इनाम देऊन त्यांनीं दाखविलेल्या कर्तव्यनिष्ठेबद्दल आपला संतोष व्यक्त केला.

---

गोष्ट २२ वी

## भूषण कवि

भूषण कवीचा भाऊ चिंतामण कवि हा दिल्लीच्या बादशहाच्या पदरीं होता. आपल्या या भावाच्या शिफारशीनें भूषण कवीलाहि बादशहाच्या दरबारांत आश्रय मिळाला असता. पण कोणाहि यवनाची सेवा करणार नाहीं, असें त्यानें आपलें ब्रीद ठरवलें होतें. त्यामुळें कमाहूच्या रजपूत राजाकडे जाऊन भूषणनें त्याची सेवा पत्करली. आपल्या कवित्वानें या राजाचें मन रिझविण्याची कामगिरी भूषण इतक्या चांगल्या रीतीनें पार पाडूं लागला कीं, एकदां त्याच्या कवित्वावर खूष होऊन या राजानें त्याला एक लाख रुपये दक्षणा म्हणून दिली. पण ही दक्षणा देतांना त्या राजाच्या तोंडून उद्गार निघाले, 'एका कवीला एक लक्ष रुपये दक्षणा देणारा दाता माझ्याशिवाय दुसरा कोणी या पृथ्वीवर आहे का?' याप्रसंगीं स्वाभि-

१२५५५६

 ३।८।८५१

मानी भूषण कवीनें या राजाला तत्काळ उत्तर दिलें, 'तुमच्या-सारखे दाते बहुत आहेत, परंतु असा कोणी याचक माझ्या-शिवाय दुसरा कोणी तुम्हीं पाहिला आहे का, कीं जो गर्वोक्तीनें दिलेले लक्ष रुपये तुच्छ लेखून त्यांना स्पर्शहि करीत नाहीं ?'

यानंतर तें द्रव्य न स्वीकारतां त्या कमाहूच्या राजाची नोकरी सोडून भूषण कवि दक्षिणेंत आला व शिवाजीमहा-राजांची त्यानें भेट घेतली. या भेटींत. यवनांचा जो कोणी शत्रु असेल, त्यांजकडे आपण रहाणार, असा आपला मनोदय त्यानें महाराजांकडे व्यक्त केला.

'मी यवनांचा काळ आहें !' असें याप्रसंगीं त्याला महाराजांनीं उत्तर दिल्यावर त्यानें तेव्हांपासून शिवाजीमहा-राजांची सेवा पत्करली. तो महाराजांच्या सेवेंत होता, त्या अवधींत त्यानें महाराजांचा प्रताप वर्णन करणारा सुप्रसिद्ध 'शिव–भूषण' हा काव्यग्रंथ हिंदींत लिहिला.

शिवाजीमहाराजांच्या पदरीं चार–पांच वर्षें राहून परत आपल्या गांवीं जातांना भूषण कवीनें आपला भाऊ चितामण कवि याला भेटण्याकरतां दिल्ली येथें त्याच्या घरीं कांहीं दिवस मुक्काम केला. भूषण कवि शिवाजीराजांकडून मानमरातब मिळवून दिल्लींत आला आहे, हें कळल्यावर बादशहानें त्याला आपल्या भेटीस घेऊन येण्याची चितामण कवीस आज्ञा केली. त्याप्रमाणें चितामण कवि आपल्या बंधूस घेऊन दरबारांत आल्यावर बादशहा भूषण कवीला म्हणाला, 'आमच्यासंबंधीं कवित्व करा. आम्ही सार्वभौमपदाधिकारी, पृथ्वीवरील सर्व राजे आम्हांस करभार देऊन आमचे मांडलिक होतात, असें वर्णन या कवित्वामध्यें असावें.'

यावर भूषण कवीनें जें आपलें कवित्व बादशहाला ऐक-वलें तें हें–

'सर्व पृथ्वीवरील राजे हे पुष्पवृक्ष होत. दिल्लीश्वर हा त्या सर्वांमधला मधुसेवन करणारा भ्रमर. मात्र या पुष्पवृक्षां-

मधला चंपकवृक्ष म्हणजे शिवाजीमहाराज !'

चंपकवृक्षाला भ्रमर शिवत नाहीं ही काव्यामधली खोंच होय हें कवित्व ऐकून बादशहाला भूषणच्या बुद्धिकौशल्याचें फार कौतुक वाटलें.

---

गोष्ट २३ वी

## दीपाबाईचा शहाणपणा

शिवाजीनें आपला सावत्र भाऊ जो व्यंकोजी, याजकडे कर्नाटकांतील व्यंकोजी उपभोगीत असलेल्या वडिलार्जित राज्याचा अर्धा वांटा आपल्याला त्यानें द्यावा, असें मागणें केलें. व्यंकोजीनें शिवाजीची ही रास्त मागणी मानली नाहीं व युद्धाचा प्रसंग आणला. या युद्धांत व्यंकोजीचा पराभव झाल्यावर त्यानें आपल्याशीं तह करावा, असें त्याच्याशीं सामोपचाराचें बोलणें आपला कर्नाटकांतील कारभारी रघुनाथपंत हणमंते याच्यामार्फत त्यानें सुरू केलें. पण व्यंकोजी यावेळीं डोक्यांत राख घालून बसला व या तहालाहि तो कबुली देईना. त्यामुळें रघुनाथपंत अडचणींत सांपडला. अशा या पेंचप्रसंगामध्यें व्यंकोजीची बायको दीपाबाई हिचा शहाणपणा उपयोगाला आला. ती मोठी गुणवती व विचारी होती. शिवाजीशीं वैर करण्यांत व्यंकोजीचें हित नाहीं ही गोष्ट मोठ्या गोड रीतीनें बरेच दिवस त्याला पटवीत राहून, शेवटीं तिनें शिवाजीशीं तह करावयाला त्याची कबुली मिळवली. रघुनाथपंतांनीं मग तहावर त्याची सही घेऊन त्याच्या वांट्याला येणारा योग्य तेवढा कर्नाटकच्या राज्यांतील मुलूख त्याला तोडून दिला व अशा रीतीनें व्यंकोजी व शिवाजी यांच्यामध्यें आलेलें हें वैमनस्य शेवटीं नाहीसें झालें.

शिवाजीला जेव्हां या सर्व प्रकरणामध्यें दीपाबाईनें दाखवलेला शहाणपणा कळून आला तेव्हां गृहकलह मिटवणाऱ्या

आपल्या या धाकटच्या भावजयीचें त्याला कौतुक वाटलें व तिच्या गुणाबद्दल पारितोषिक म्हणून तिला त्यानें खास तिच्याकरतां पांच लक्ष होनांचा मुलूख चोळीबांगडीकरितां म्हणून तोडून दिला व ही दौलत तिच्या मुलीच्या वंशाकडे चालावी, अशी यासंबंधींच्या बक्षीसपत्रामध्यें तरतूद केली.

गोष्ट २४ वी

## शिवाजीमहाराजांचे हत्ती

शिवाजीमहाराज जेव्हां व्यंकोजीच्या भेटीसाठीं तंजावरला जावयाला निघाले तेव्हां त्यांना भागानगरमधून प्रवास करावा लागला. भागानगरच्या बादशहाशीं तह झाला असल्यामुळें शिवाजीचे त्याच्याशीं चांगलें संबंध होते. त्यामुळें या बादशहाचा दिवाण मादण्णापंत हा जेव्हां शिवाजीमहाराजांना



सामोरा आला व त्यानें बादशहाच्या भेटीचें त्यांना मित्रंत्रण दिलें तेव्हां तें निमंत्रण स्वीकारून महाराज बादशहाच्या दरबारांत त्याच्या भेटीकरितां गेले. या बादशहाला उत्तमोत्तम हत्ती पैदा करून त्यांची आपल्या सैन्यांत भरती करण्याचा शौक होता व आपल्या राज्यांत हत्ती आहेत, तसे दुसऱ्या कुठल्याहि राजाकडे नाहींत, असा त्यास गर्व वाटत असे. त्यामुळें शिवाजीमहाराजांबरोबर संभाषण चाललें असतां बादशहानें महाराजांस प्रश्न केला, 'आपल्या सैन्यांत नामी हत्ती किती आहेत?' महाराजांनीं यावर उत्तर केलें, 'थोडा वेळ थांबा. मी माझे हत्ती तुम्हांला दाखवतों.' नंतर छावणींत निरोप पाठवून कंक, मालुसरे, हंबीरराव सरनौबत अशा आपल्या शेंशंभर सरदारांना दरबारांत बोलावून घेतलें व त्यांपैकीं एकेकानें बादशहाला मुजरा केल्यावर ते बादशहाला म्हणाले, 'मीं बाळगलेले माझे हत्ती ते हे!'

---

## गोष्ट २५ वी

IRBK-0116557

## वेडा नाराय

IRBK-0116557

अडीचशें वर्षांमागें ज्योतिपंत नांवा[illegible] होऊन गेले. आपला शिष्यपरिवार घेऊन ते गांवोगांव प्रवास करीत व कथाकीर्तनाच्या रूपानें लोकांना भगवद्भक्तीचा उपदेश करीत. त्यांच्या एका शिष्याचें नांव नारायण असें होतें. इतर कुठल्याहि शिष्यांपेक्षां त्याची आपल्या गुरूवर जास्त भक्ति होती. पण तो भोळसर स्वभावाचा असल्यामुळें 'वेडा नारायण' म्हणून इतर शिष्य त्याची चेष्टा करीत. एकदां ज्योतिपंतांचा मुक्काम कोल्हापूर येथें असतांना नारायणाची कुचेष्टा करणाऱ्या या आपल्या शिष्यांना चांगला धडा शिकविण्याचें त्यांनीं ठरवलें. त्यांना त्यांनीं जवळ बोलावलें– 'तुम्ही वेंगुर्लें बंदराला जा व मला पांच हजार रुपयांची गरज आहे तेवढी रक्कम

तुमच्याबरोबर पाठीव, असा तेथल्या समुद्राला माझा निरोप सांगा!'

आपल्या गुरूचें हें विचित्र भाषण ऐकल्यावर ते सगळे शिष्य बुचकळ्यांत पडले व त्यांना म्हणाले–

'समुद्र आहे खारें पाणी। तेथें काय करावें आम्हीं जाऊनी?<br>
द्रव्य कैसे देईल आम्हांलागुनी? । कैसें घडे स्वामिया?<br>
लोक करितील विटंबना। म्हणतील काय हा शहाणपणा!।<br>
जळीं, काष्ठीं, पाषाणीं। द्रव्य कैसें मिळे तुम्हांसी?'

हे शिष्य आपल्या सांगण्याप्रमाणें वागायला तयार नाहींत हें पाहिल्यावर शेवटीं बुवांनीं नारायणाला हांक मारली व त्याला हें काम सांगितलें. त्यांच्या तोंडून शब्द निघण्याचाच अवकाश, लगेच नारायणानें आपली पडशी खांद्यावर ठेवली



व तो जावयाला निघाला. तेथें पोंचल्या-
वर तो वेंगुर्ल्याच्या समुद्राकडे [illegible]ला व समुद्राला आपल्या गुरूंचा
निरोप समुद्रकिनाऱ्याव[illegible] 'माझ्या [illegible]ंनीं लवकर जरूर
सांगून म्ह[illegible]

आहे. तरी ही रक्कम लगेच माझ्या हवालीं कर. ती केली नाहींस तर अन्नप्राशन न करतां तुझ्या या तीरावर बसून राहीन. येथून मुळींच हलणार नाहीं, व मी जर मेलों, तर तुला ब्रह्महत्येचें पातक लागेल !'

त्याप्रमाणें नारायण लागोपाठ तीन दिवस त्या समुद्र-किनाऱ्यावर धरणें धरून बसला.

शेवटीं तिसऱ्या दिवशीं रात्रीं समुद्र मनुष्यरूप धारण करून सावंतवाडीला एक श्रीमंत सावकार रहात होता, त्याच्या स्वप्नांत गेला व त्याला म्हणाला, 'तुझा पुत्र ज्या जहाजांतून व्यापाराकरतां परदेशांत गेला होता तें जहाज बेपत्ता झालें आहे, म्हणून तूं काळजींत पडला आहेस. त्या तुझ्या मुलाला थोड्याच दिवसांनीं मी सुखरूप तुझ्या घरीं परत आणीन. पण त्याआधीं माझें एक काम केलें पाहिजेस. उद्यांच्या उद्यां पांच हजार घेऊन वेंगुर्ल्याला माझ्या किनाऱ्यावर ये. कोल्हापुराहून आलेला एक तरुण ब्राह्मण अन्नपाणी वर्ज्य करून या रकमेकरतां तेथें धरणें धरून बसलेला तुला दिसेल. त्याला ही रक्कम दे व सांग कीं, मला समुद्रानें हे पांच हजार रुपये तुला देण्याकरतां माझ्याकरवीं पाठविले आहेत.'

दुसरे दिवशीं तो सावकार वेंगुर्ल्याच्या समुद्रावर जाऊन पोहोंचला. समुद्रानें वर्णन केलें होतें तसा हुबेहूब एक तरुण ब्राह्मण किनाऱ्यावर बसलेला दिसतांच, समुद्राचा निरोप कळवून ती रक्कम त्यानें नारायणाच्या हवालीं केली.

नारायण मग कोल्हापूरला परत आला व समुद्राकडून मिळालेली ही रक्कम त्यानें आपल्या गुरुच्या चरणांवर ठेवली. हा चमत्कार पाहिल्यावर त्यांचे इतर शिष्य अगदीं थिजून गेले.

वेड्या नारायणानें समुद्राकडून आणलेल्या या द्रव्याचा विनियोग ज्योतिपंतांनीं कोल्हापूरचा पद्माळें नांवाचा तलाव व तेथलें पांडुरंगाचें देवालय बांधण्याकडे केला.